पुण्य नगरी

# रवळनाथला २ कोटी ४३ लाखांचा निव्वळ नफा

## एम. एल. चौगुले : ठेवीत ५५ कोटींची वाढ; ७५७ कोटींचा एकूण व्यवसाय

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीमध्ये ४३५ कोटींच्या ठेवी आहेत. वार्षिक व्यवसाय एकूण ७५७ कोटी झाला असून, २ कोटी ४३ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. या वर्षातदेखील संस्थेच्या ठेवीत ५५ कोटींची वाढ झाली असून, संस्थेने सर्वोत्तम कामगिरीचा वाढता आलेख कायम ठेवल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या १२४३० इतकी आहे. ३२२ कोटींची कर्जे वितरित करण्यात आली आहेत. खेळते भांडवल ५१८ कोटींचे असून, एकूण गुंतवणूक १६२ कोटींची आहे. गतवर्षीच्या ठेवींमध्ये तब्बल ५५ कोटींची वाढ झाली आहे.

संस्थेची स्वतःची वेबसाईट असून, त्यावरून वार्षिक अहवालासह दैनंदिन ताज्या घडामोडींची माहिती दिली जाते. सध्या मोबाईल बँकिंग, सी.बी.एस. मायक्रो एटीएम याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. तसेच आरटीजीएस, एनईएफटी, लॉकर, वीज बिल भरणा यासह पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ॲटोमेटेड क्लिअरिंग हाऊस ही सेवा, तसेच गंभीर आजारी व वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा सुरू आहे. संस्थेला स्वतंत्र आयएफएससी कोड मिळाला आहे.


एम. एल. चौगुले

गडहिंग्लज येथे संस्थेची स्वःमालकीची प्रधान कार्यालयाची इमारत आहे. संस्थेच्या अकरा शाखांपैकी गडहिंग्लज, कोल्हापूर, जयसिंपूर, कुडाळ, सांगली व पुणे या शाखादेखील स्वमालकीच्या इमारतीमध्ये आहेत. सध्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, कुडाळ, सांगली व पुणे या ठिकाणी संस्थेच्या शाखा आहेत. या आर्थिक वर्षात केंद्रीय निबंधकांकडून नवीन सात शाखांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी लवकरच कराड, सांगोला आणि धारवाड येथील शाखा सुरू होत आहेत. सोने तारण व गृहोपयोगी उपकरणे खरेदी कर्ज सुविधा असून, प्लॉट खरेदी व गृहकर्जाची मर्यादा प्रत्येकी ९० लाख, तर शैक्षणिक कर्जाची मर्यादा ५० लाखांपर्यंत आहे. महिला व आजी-माजी सैनिकांसाठी ठेवीवरील व्याजदरात अर्धा टक्के वाढ, तर कर्ज व्याजदरात सवलत देण्यात आली आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी संचालक, शाखांचे अध्यक्ष, सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी, शाखाधिकारी व कर्मचारी, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहकांचे सहकार्य लाभल्याचे चौगुले यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, संचालक आर. एस. निळपणकर, महेश मजती, डी. के. मायदेव, शिवानंद घुगरे, सागर माने, बाबासाहेब मार्तंड उपस्थित होते.